**नि. फौ. खटला क्र.११३/२०२२**

**निशाणी क्र.८१**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०४ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करते की,**

**माझे नांव** : सुवर्णा मारुती कांबळे,

**वय** : ४० वर्षे, **काम** : अंगणवाडी मदतनीस,

**राहणार** : येणकी, ता. उदगीर, जि. लातूर.

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.एस. कुलकर्णी यांचेमार्फत ::**

फिर्यादी दयानंद माझा भाऊ आहे. मी आरोपींना ओळखते. ते माझ्या गावातील आहेत. दि.२८/०५/२०२२ रोजी रात्री १०.०० वाजता मी मोठा भाऊ गौतम कांबळेच्या घरी सांगायला गेली होती की, दयानंदला शेतात मारहाण केली. दयानंद हा घरी आला होता. त्याने मला सांगितले होते की, माणिकप्रभू व सुकुमार यांनी त्याला शेतामध्ये मारहाण केली, २० हजार रुपये काढून घेतले. त्यानंतर सर्व आरोपी गौतमच्या घरासमोर आले होते आणि तुकडे तुकडे करतो असे म्हटले होते. त्यांनी आम्हाला शिव्या दिल्या होत्या आणि जिवे मारण्याची धमकी दिली होती. आरोपी न्यायालयामध्ये हजर आहेत. रुक्मीण, वच्छला, विठ्ठल व तुळशीराम हे आजरोजी गैरहजर आहेत.

सरतपास पूर्ण.

**:: आरोपी क्र.२ ते ६ व ८ ते १३ करिता उलटतपास अधिवक्ता श्री. एन.एल. मध्वरे यांच्यामार्फत ::**

०२. माझे शिक्षण १० वी पर्यंत झाले. मला लग्नानंतर माणकी येथे दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आणि फिर्यादी यांच्यामध्ये जमिनीचा वाद आहे. सदर जमीन येणकी येथील आहे. फिर्यादीने आरोपीविरुध्द दिवाणी दावा दाखल केल्याचे मला माहीत नाही. मी फिर्यादीने दाखल केलेल्या दाव्यामध्ये वादी आहे. सदर दाव्यामध्ये आम्ही मनाईहुकूम मागितला हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमचा मनाईहुकूमाचा अर्ज नामंजूर झाला. तहसील कार्यालय उदगीर, जिल्हाधिकारी कार्यालय लातूर आणि

आयुक्तालय औरंगाबाद येथील प्रकरणामधील निर्णय आमच्याविरुध्द लागलेला आहे हे मला माहीत नाही. मी सदर प्रकरणामध्ये पक्षकार आहे.

०३. मी कथित शेतातील घटनेच्या वेळी शेतात नव्हते. परंतु हे म्हणणे खरे नाही की, मी कथित रात्रीच्या घटनेच्यावेळी गौतमच्या घरी नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी दयानंदला मदत करण्यासाठी खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, आमच्याविरुध्द सर्व निकाल गेल्याने आरोपींनी तडजोड करण्यासाठी दयानंदने खोटी केस केली आणि मी खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी कथन केल्याप्रमाणे घटना घडली नाही.

उलटतपास पूर्ण.

:: **<u>आरोपी क्र.१, ९, १४ व १५ करिता उलटतपास अधिवक्ता श्री. एम.बी. बिरादार यांच्यामार्फत</u>** ::

०४. मी जळबा भुताळे यांना ओळखते. माणिकप्रभू व गोविंद यांचे ते वडील होते. जळबाचा वर्ष २०२० मध्ये मृत्यू झाला हे मला माहीत नाही. जळबाची पत्नी मयत झाली असेल. हे म्हणणे खरे नाही की, जळबा भुताळेच्या नावे सर्वे क्र.७९/३ मध्ये ० हे. ९२ आर जमीन होती. जळबाच्या मृत्यूनंतर सदर मिळकत माणिकप्रभू व ईतर वारसांच्या नावे झाल्याचे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दयानंदला मदत करण्यासाठी खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे आहे की, सावित्री आणि गोविंद हे पूर्वीपासून अपंग आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माणिकप्रभूला बेंबीचा त्रास असल्याने चालता फिरता येत नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे ) ( श.अ. सुरजुसे )

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.

दि.२०/०४/२०२६.